**सं.फौ.ख. क्रं.४४४/२०२६**
**निशाणी क्रं. –**

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चा अधिनियम दोन प्रकरण एकविस अन्वये संक्षीप्त संपरिक्षा केलेली ए.एस.गुंजवटे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रं.१ निलंगा, यांचे न्यायालयात**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | – | ०७/०६/२०२६. |
| २. | अहवालाचा दिनांक | – | ०७/०६/२०२६. |
| ३. | फिर्यादीचे नांव वय व पत्ता | – | महाराष्ट्र सरकारतर्फे , शिरुर अनंतपाळ पोलिस स्टेशन, |
| ४. | आरोपीचे नांव वय व पत्ता | – | राहुल नरसिंग मादळे, व.व.३०, धंदा– चालक, रा. साकोळ शिरुर अनंतपाळ, जि.लातूर |
| ५. | आरोपीला समजावून सांगणेचा | – | सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ चे कलम ६(अ), २४(१), २४(२) सह कलम २४ प्रमाणे. |

६. **तपशिल :–**

तुम्ही दिनांक ०७/०६/२०२६ रोजी १२.०० वाजणेचे सुमारास साकोळ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील साकोळ ते येरोळ जाणारे रोडचे पश्चिम बाजुस असलेले सुर्यवंशी पान स्टॉल दुकानामध्ये छापा टाकला असता सदर ठिकाणी एक इसम १८ वर्षाखालील युवकांना आरोपी नामे राहुल नरसिंग मादळे हे त्या ठिकाणी विनापरवाना बेकायदा इतरांना धुम्रपान करण्यासाठी सिगारेट, बिडी, तंबाखुजन्य पदार्थ आरोग्याबाबत कोणतीही सुचना नसलेला माल विक्री करण्याच्या

उ्ददेशाने स्वतःच्या कब्जात बाळगताना मिळुन आला त्यायोगे तुम्ही सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ चे कलम ६(अ), २४(१), २४(२) सह कलम २४ प्रमाणे अपराध केलेला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे. आरोपीला आरोप वाचून दाखविणेत आला व समजाविणेत आला.

७. **आरोपीचे प्रतिकथन**

प्र. १ तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर होय.

प्र. २ दोषारोपातील आरोप तुम्हाला वाचून व समजावून सांगितले ते तुम्हाला समजले काय ?

उत्तर होय.

प्र. ३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर होय, मला गुन्हा कबूल आहे.

समोर,

....................

आरोपीची सही

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.06.09 17:53:22 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

**दिनांकः–०९/०६/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा.**

**ठिकाणः–निलंगा** **जिल्हा लातूर.**

**(न्यायालय क्र.०१)**

आरोपीने सदरचा गुन्हा कबूल केलेला आहे. आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. तरी कमीत कमी शिक्षा व्हावी अशी विनंती केली. गुन्हयाचे स्वरुप पाहता खालील प्रमाणे आदेशित केलेली शिक्षा न्यायसंगत दिसून येते.

<u>**आदेश**</u>

आरोपी **राहुल नरसिंग मादळे** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ६(अ), २४(१), २४(२) अन्वये सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ चे कलम ६(अ), २४(१), २४(२) सह कलम २४ प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येते असून त्याला कलम ६(अ), २४(१), २४(२) अन्वये सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ चे कलम ६(अ), २४(१), २४(२) सह कलम २४ प्रमाणे या गुन्हयाकरीता **रक्कम रुपये २००/-(रुपये दोनशे रुपये फक्त)** दंडाची शिक्षा सुनावणेत येत आहे. वरील एकूण **दंडाची रक्कम न भरल्यास ४ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा** सुनावणेत येत आहे.

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.06.09 17:53:32 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

**दिनांकः-०९/०६/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा.**

**ठिकाणः-निलंगा** **जिल्हा लातूर.**

**(न्यायालय क्र.०१)**